# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दिनांकः- १३/०२/२०१९

## व्हॉलीबॉल चॅम्पियन होण्यासाठी भिडणार १० संघ

- **गडचिरोली पोलीस विभागाव्दारा आयोजित बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा रंगतदार स्थितीत**

मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली शैलेश बलकवडे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली जिल्हयात बिरसा मुंडा व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासी बहुल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेची सुरवात बिरसा मुंडा जयंती निमित्य झाली आहे.

आत्तापर्यंत अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत जिल्हाभरातून तब्बल ९१६८ युवकांनी व ७६४ संघांनी भाग घेतला आहे. पोस्टे, उपपोस्टे, पोमके स्तरावर स्पर्धेत भाग घेतलेल्या संघांचे साखळी पदधतीने सामने पार पडून यातून अंतिम विजेत्या संघास उपविभागीय स्तरावर होणा-या स्पर्धेत प्रवेश मिळाला. उपविभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धा नुकत्याच पार पडलेल्या असून यातून विजेते ठरलेले १० संघ १) आर.डी कॉलेज व्हॉलीबॉल संघ आलापल्ली - उपविभाग अहेरी २) न्यु फास्टर व्हॉलीबॉल संघ धानोरा- उपविभाग धानोरा ३) व्हॉलीबॉल संघ असरअल्ली- उपविभाग सिरोंचा ४) न्यु स्टार व्हॉलीबॉल संघ शंकरपुर/देसाईगंज- उपविभाग कुरखेडा ५) ताडगाव व्हॉलीबॉल संघ ताडगाव- उपविभाग भामरागड ६) जिल्हा क्रिडा व्हॉलीबॉल प्रशिक्षण संघ गडचिरोली- उपविभाग गडचिरोली ७) व्हॉलीबॉल संघ कारवाफा- उपविभाग पेंढरी ८) जय सेवा व्हॉलीबॉल संघ मरपल्ली - उपविभाग जिमलगटटा ९)

मोडस्के व्हॉलीबॉल संघ गट्टा (जां.)- उपविभाग हेडरी १०) इंडियन व्हॉलीबॉल संघ एटापल्ली - उपविभाग एटापल्ली हे दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ रोजी जिल्हा स्तरावर पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे अंतिम विजेते पदासाठी होणा-या सामन्यांसाठी पात्र ठरले आहेत. आता गडचिरोली जिल्हयाचा व्हॉलीबॉल चॅम्पियन होण्यासाठी या १० संघांमध्ये चुरशीच्या लढती पहायला मिळणार आहेत.

विजयी होणाऱ्या ३ संघांना अनुक्रमे प्रथम बक्षिस रु. २५,०००/-, व्दितीय बक्षिस रु. २०,०००/- व तृतीय बक्षिस रु. १५,०००/- रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र असे पारितोषिक गडचिरोली पोलीस विभागा तर्फे मान्यवरांच्या हस्ते देवून गौरविण्यात येणार आहे.

